www.arthritis-india.com

# निवडक रुग्ण कथा

डॉ. श्रीकान्त वाघ, ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट, पुणे

Coping with Rheumatoid Arthritis (Marathi)



## बालपणीचा संधिवात-
## ओंकार सामक (सांगली) मो. ०९८९०५३४६६०

माझे नाव ओंकार शिरीष सामक. मला वयाच्या नवव्या वर्षापासून संधिवाताचा त्रास आहे. लहानपणी क्रिकेट खेळत असताना माझ्या उजव्या पायाच्या गुडघ्याला बॅट लागली. त्यामुळे तेथे हाडाला छोटासा क्रॅक पडला. पुढे सायकलवरून शाळेला जात असताना त्याच गुडघ्यावर आणखी दोन वेळा पडलो. त्यामुळे माझ्या गुडघ्याला सूज आली आणि तेथे असह्य वेदना होऊ लागल्या. पुढे खांदे, मनगट, कोपर आणि पायालाही सूज येऊ लागली. मला चालता, उठता अथवा जमिनीवर व्यवस्थित मांडी घालून बसता येईना. सायकलही चालवता येईना. याच आजाराने माझे दोन्ही डोळे लाल होऊन डोळ्यांच्या बाहुल्या मोठ्या झाल्या आणि मला व्यवस्थित दिसेना.

वेगवेगळ्या डॉक्टरांच्या वेगवेगळ्या आणि चुकीच्या उपचारांमुळे माझ्या त्रासामध्ये अधिकच वाढ झाली. औषधांच्या दुष्परिणामांमुळे माझी पचनक्रिया बिघडली. हिमोग्लोबीन कमी झाले. माझे वजनही बरेच घटले.

या आजारामुळे माझ्या शिक्षणावर विपरीत परिणाम झाला. माझी दहावी व बारावी बोर्डाची परीक्षा याच अडचणीच्या परिस्थितीत दिली. याच कारणामुळे मी विद्यापीठाच्या पहिल्या वर्षीच्या परीक्षेत नापास झालो. एकंदरच शारीरिक व मानसिक खूप त्रास झाला.

आता मी यातून बरा होणार नाही असे काही डॉक्टरांनी तसेच इतर आप्तेष्टांनीही सांगितले, यामुळे माझे व माझ्या आई-वडिलांचे मन फार खचून गेले. माझ्या फॅमिली डॉक्टरांनी जून २००७मध्ये या आजारावर चांगले उपचार होण्यासाठी पूना हॉस्पिटलमध्ये डॉ.श्रीकांत वाघ यांचा सल्ला घेण्यास सांगितले.

त्यांनी मला नेमका कुठल्या प्रकारचा संधिवात झाला आहे याचे योग्य व व्यवस्थित निदान केले, माझ्या आई-वडिलांशी चर्चा केली व उपचार करण्यास सुरूवात केली. या उपचारांमुळे माझी पचनशक्ती आणि प्रतिकारशक्ती वाढली. सहा महिन्यांच्या कालावधीतच मला थोडं थोडं चालायला व उठून बसायला येऊ लागले.

डॉक्टरांनी माझे उपचार तसेच सुरू ठेवले. सुरूवातीला औषधे थोडी जास्त होती पण हळूहळू त्यांचे प्रमाण कमी झाले. गेल्या दोन वर्षात माझ्या तब्येतीमध्ये खूपच सुधारणा झाली. माझे वजन वाढले. मला जमिनीवर व्यवस्थित बसता येऊ लागले. चांगले चालता येऊ लागले. सायकलही चालवता येऊ लागली. डॉक्टरांच्या उपचारामुळे माझ्या डोळ्यांच्या बाहुलीची सूजदेखील कमी झाली. मला व्यवस्थित दिसू लागले. माझ्या आजारपणात मला भेटलेल्या नातेवाईकांना या सुधारणांमुळे आता मी ओळखूदेखील येत नाही. ते सारे आश्चर्याने माझी ट्रीटमेंट कोठे झाली याची चौकशी करतात.

आता मी माझे शैक्षणिक वर्ष व्यवस्थितरीत्या पूर्ण करत आहे आणि मला कोणताही व कसलाही त्रास होत नाही. आता माझे आयुष्य व्यवस्थित व चांगल्यारीतीने चालले आहे. हे सर्व डॉ.श्रीकांत वाघ यांच्यामुळे साध्य झाले. त्याबद्दल मी त्यांचा खूप-खूप आभारी आहे.